# वाणिज्य हा अर्थव्यवस्थेचा आत्मा - प्रोफेसर डॉ. श्रीकृष्ण महाजन

अर्थव्यवस्थेच्या विकासामध्ये आणि स्थिरतेमध्ये वाणिज्य शाखेतील संशोधनाचा बहुमूल्य वाटा आहे वाणिज्य आणि अकाउंटन्सी शाखेतील शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यांनी अनुभवातून शिक्षण व प्रयोगातून शिक्षण घेणे आवश्यक आहे. दैनंदिन जीवनामध्ये प्रत्यक्षरीत्या प्रयोगातून व अनुभवातून शिक्षण घेऊन अर्थव्यवस्थेतील बदलांचे व घटनांचे बारकाईने निरीक्षण करून शिक्षण घेणे आज आवश्यक बनले आहे. माहिती तंत्रज्ञान आणि संदेशवहन तसंच तसेच कृत्रिम बुद्धिमत्तेचा वाढता वापर यामुळे उत्पादन, विपणन, विक्री व जाहिरात या सर्व व्यावसायिक क्रियांमध्ये अमुलाग्र बदल झाले आहेत त्यानुसार विद्यार्थ्यांनी आवश्यक असे ज्ञान अर्जित करणे आवश्यक आहे. तर बदलासमोर हार न मानता बदलाशी स्वतःला जुळवून घेणे आवश्यक आहे सध्या अमेरिका सरकारचे धोरण भारतीय अर्थव्यवस्थेला अनेक आव्हाने निर्माण करत असून अमेरिकेचे टेरिफ वाढवण्याचे धोरण याचा विपरीत परिणाम आपल्या अर्थव्यवस्थेवर तसेच कोल्हापूर जिल्ह्यामध्ये असणाऱ्या व्यवसायावर देखील होतो आहे कारण कोल्हापूर जिल्ह्यातील अनेक उद्योग अमेरिकेला वस्तूंचा पुरवठा करत असतात, निर्यात करत असतात आणि जवळपास अठ्ठावीस टक्के टेक्स्टाईल व्यवसाय कापड निर्यात करतो त्यामुळे विद्यार्थ्यांनी या प्रत्येक गोष्टीकडे संशोधक वृत्तीने पाहणे गरजेचे आहे असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य आणि व्यवस्थापन अधिविभागाचे अधिष्ठाता प्रोफेसर डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी केले. श्री व्यंकटेश महाविद्यालय इचलकरंजी येथे वाणिज्य आणि अकाउंटन्सी असोसिएशन उद्घाटन कार्यक्रमप्रसंगी ते बोलत होते. भारत आणि इतर राष्ट्रांशी असलेला व्यापार, करार यांच्यामध्ये वाणिज्य क्षेत्र अत्यंत महत्त्वाची भूमिका पार पडत असते. भारताला सुद्धा निर्यातीसाठी अनेक पर्यायी देश उपलब्ध असून आंतरराष्ट्रीय दबावातून बाहेर पडण्यासाठी या देशांना वस्तू आणि सेवांचा पुरवठा करणे आवश्यक आहे असे ते म्हणाले. महाविद्यालयाचा विद्यार्थी ते वाणिज्य आणि व्यवस्थापन अधि विभागाचा अधिष्ठाता पदापर्यंत उत्तुंग मजल मारलेले अभ्यासू व संशोधक वृत्तीचे व्यक्तिमत्व आज वाणिज्य आणि अकाउंटन्सी असोसिएशनच्या उद्घाटनाप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित लाभले हे आमचे भाग्य. महाविद्यालयाच्या दृष्टीने ही एक अभिमानास्पद गोष्ट असून वाणिज्य आणि अकाउंटन्सी असोसिएशनची निर्मिती विद्यार्थ्यांना विविध प्रकारचे ज्ञान मिळावे यासाठी वर्षभर परिसंवाद, चर्चासत्र, आणि सेमिनारचे आयोजन या असोसिएशन मार्फत केले जात असते असे उद्गार महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतामध्ये काढले. कार्यक्रमाच्या सुरुवातीस अकाउंटन्सी विभागाच्या डॉ. एस. एच. अंबवडे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व प्रमुख पाहुण्यांची ओळख करून दिली तर आभार प्रदर्शन आणि

सूत्रसंचालनाची जबाबदारी अनुक्रमे टी. एन. मुल्ला आणि मोहिनी अंचलीया यांनी केले कार्यक्रमासाठी मोठ्या प्रमाणावर विद्यार्थी विद्यार्थ्यांनी प्राध्यापक व प्राध्यापक वर्ग उपस्थित होता.

